# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## विकास योजना विशेष योजना घटक विभाग

### जाहीर आवाहन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा सुधारित प्रारुप विकास आराखडा दि.१२/१०/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. सदर प्रारुप विकास आराखड्याबाबत संबंधितांकडे विधाग्राह्य पद्धतीने विहीत सुचना व हरकती प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत महानगरपालिकेकडे सादर करण्याबाबत सुचित करण्यांत आलेले आहे. सदर सुधारीत प्रारुप विकास आराखड्याच्या अनुषंगाने नागरिकांच्या असलेल्या हरकती व सुचना दाखल करणे करीता नागरिकांनी विधीग्राह्य मार्गाचा अवलंब करणे अभिप्रेत आहे.

परंतू, शहरामध्ये काही संस्था / नागरिकांकडून प्रारुप विकास आराखड्यातील आरक्षणे/डी.पी. रस्ते इ. बाबत आवश्यक बदल करुन घेणेबाबत, नागरिकांना प्रलोभन दाखविले जात असल्याची व नागरिकांची दिशाभूल करीत असल्याची बाब काही सुजाण नागरिकांकडून आमच्या निदर्शनास आणून देण्यांत आले आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर असून, बेकायदेशीर आहे.

त्यामुळे, महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यांत येते की, सुधारित प्रारुप विकास आराखड्याबाबत नागरिकांना असलेल्या हरकती व सुचना नागरिकांनी विधीग्राह्य पद्धतीने महानगरपालिकेकडे सादर करावे. कोणतीही संस्था अथवा नागरिक यांचेकडून प्रारुप विकास आराखड्यामधील आरक्षण/डि.पी. रस्ता यांचेमध्ये आवश्यक बदल करुन देणेबाबत प्रलोभन दाखविण्यांत येत असल्यास अथवा नागरिकांची दिशाभूल केली जात असलव्यास, त्या प्रलोभनांना कृपया बळी पडू नये.

अशा पद्धतीने कोणतीही संस्था अथवा नागरिकांकडून प्रारुप विकास आराखड्याबाबत नागरिकांना प्रलोभन देणे अथवा दिशाभूल करण्याची बाब निदर्शनसा आल्यास, संबंधितांवर कायदेशीर पद्धतीने गुन्हा दाखल करण्यांत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,**
**भिवंडी.**